ISSN : 2454-2415

Volume VI, Issue 8 August, 2018

# INTERNATIONAL JOURNAL OF INNOVATIVE KNOWLEDGE CONCEPT

www.ijikc.co.in

SONHIRA PUBLICATION

| Sr.No. | Article Name | Author Name | Page No. |
|---|---|---|---|
| 20 | Buddhist Sanskrit Language in Gaṇḍavyūha sūtra : Some Observations | Mithun Howladar | 117-123 |
| 21 | Collaboration of Cryptography and Steganography for Enhanced Security: A REVIEW | Swati Nagpal, Ritu Nagpal | 124-128 |
| 22 | तुलनात्मक साहित्य की पाश्चात्य एवं भारतीय अवधारणा | प्रभात रंजन | 129-132 |
| 23 | पर्यावरण और कला | कृष्णा महावर | 133-136 |
| 24. | कुमाऊँ में भांग की खेती का इतिहास | प्रेमा बिष्ट एस0के0 टम्टा | 137-142 |
| 25. | महाराष्ट्रातील जिल्हा व तालुका अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांच्या समस्या - एक शोध | Trupti Subhash Ambre B.N. Panage | 143-146 |
| 26. | Gender wise status in Jammu and Kashmir with special reference to education and economical activities: an overview | Ajay Kumar Salgotra, Kumari Roma | 147-149 |


MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI PUNE 17

ISSN : 2454-2415 Vol. 6, Issue 8, 2018 August, 2018 DOI 11.25835/IJIK-169 www.doie.org

# महाराष्ट्रातील जिल्हा व तालुका अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांच्या समस्या-एक शोध

**तृप्ती सुभाष अंब्रे[1] व बी.एम.पानगे[2]**
[1]पीएच.डी. संशोधक विद्यार्थी, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
[2] सहाय्यक ग्रंथपाल, जयकर ग्रंथालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

सारांश :

महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांसंबंधी संशोधन करीत असताना सर्व्हेक्षण तंत्र व ग्रंथपाल प्रश्नावली या साधनांचा व उपलब्ध संदर्भ साधनांचा उपयोग करुन निरिक्षणे आणि निष्कर्ष नोदविले आहेत.

सदर संशोधनात्मक लेखामध्ये महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कायदा त्यामुळे झालेल्या ग्रंथालयांचा संख्यात्मक विकास, १०१२ मध्ये नविन ग्रंथालयांना मान्यता व अनुदानासंदर्भात शासनाने दिलेली स्थगिती त्यामुळे ग्रंथालयांच्या संख्यात्मक वाढीचा खुंटलेला विकास तसेच सार्वजनिक ग्रंथालयाद्वारे दिल्या जाणाऱ्या माहिती व सेवांसंदर्भात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या कर्मचारी वर्गाच्या सेवाशर्ती व वेतन विषयक कामाच्या विशिष्ट स्वरुपामुळे निर्माण झालेल्या आरोग्यविषयक समस्यांचा तसेच पुस्तक खरेदी, रद्दीविक्री आणि नोकरभरती प्रक्रियेमधील शासकीय दप्तर दिरंगाई यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांवर येणारा ताण, ग्रंथालयांच्या संगणकीकरण व आधुनिकीकरणाची आवश्यकता, त्या कामात येणारे अडथळे, सार्वजनिक ग्रथालयांच्या इमारती व जागेसंबंधीच्या समस्या, अनुदान व निधीची कमतरता, प्रशासन व जनता यांचे या महत्त्वपूर्ण सामाजिक संस्थेकडे होणारे दुर्लक्ष इत्यादी समस्यांचा आढावा घेतला आहे.

***किवर्ड :* महाराष्ट्रातील जिल्हा ग्रंथालय, तालुका ग्रंथालय, सार्वजनिक ग्रंथालय समस्या**

प्रास्ताविक :

सार्वजनिक ग्रंथालये म्हणजे जनतेकडून जनतेसाठी चालविलेले ग्रंथालय होय. सार्वजनिक ग्रंथालयांचे कार्य आणि सेवांची व्याप्ती इतर सर्व ग्रंथालयांपेक्षा मोठी आहे. एक प्रकारे ती लोकविद्यापीठे आहेत. सार्वजनिक ग्रंथालये ही शासकीय अर्थसहाय्याद्वारे चालविली जाणारी सर्व जाती धर्माच्या, वय, लिंग अशा वाचकांचा भेदभाव न ठेवता विविध विषयांवरील जास्तीत जास्त माहिती प्रदान करणाऱ्या मुक्तद्वार, मोफत ग्रंथालयीन सेवा देणाऱ्या व निरंतर शिक्षण देणाऱ्या तसेच सांस्कृतिक उपक्रम राबविणाऱ्या संस्था आहेत. त्यामुळे या ग्रंथालयांचा प्रसार आणि विकास व्हावा ही बाब राष्ट्रीय विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. त्यामुळे या संस्थांच्या विकासासाठी स्वतंत्र अशा ग्रंथालय कायद्याची आवश्यकता वाटू लागल्यामुळे महाराष्ट्रात १९६७ मध्ये सार्वजनिक ग्रंथालय कायदा संमत झाला. सार्वजनिक ग्रंथालयांचा विकास होण्यासाठी ग्रंथालय कायद्याचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. या कायद्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांना आर्थिक पाठबळ मिळाले आणि ग्रंथ अन्य साधनसामुग्री यांच्या विकासाचा मार्ग खुला झाला.

**सार्वजनिक ग्रंथालयापुढील समस्या :**

महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांचा विकास ह्या विषयावर संशोधन करीत असताना जिल्हा 'अ' वर्ग आणि तालुका 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांच्या संदर्भात जाणवलेल्या समस्या पुढील प्रमाणे आहेत.

१. सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाने १९६७ साली ग्रंथालय कायदा संमत केला होता. त्यानुसार सार्वजनिक ग्रंथालयांचा विकास सुरु होतो. परंतु २०१२ पासून महाराष्ट्र शासनाने नवीन आदेशाद्वारे सार्वजनिक ग्रंथालयांना मान्यता व अनुदान देणे बंद केले आहे. त्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांची संख्यात्मक विकास थांबला आहे.
२. आज रोजी महाराष्ट्रात ३६ जिल्हे आहेत. परंतु ३५ जिल्ह्यातच जिल्हा 'अ' वर्ग ग्रंथालय कार्यरत होती. जालना जिल्हयातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयाच्या दर्जात बदल करून त्यास 'ब' वर्ग ग्रंथालय दर्जा देण्यात आला आहे. नव्याने निर्माण झालेल्या पालघर जिल्हयात 'अ' वर्ग ग्रंथालय अस्तित्वात नाही. तसेच महाराष्ट्रात ३६३ तालुके आहेत. त्यापैकी ११० तालुक्यांमध्ये तालुका 'अ' वर्ग ग्रंथालये कार्यरत आहेत. २५२ तालुक्यांमध्ये तालुका 'अ' वर्ग ग्रंथालये अस्तित्वात नाहीत.



MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI PUNE-17